पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरतीच्या कार्यपध्दतीमध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक : संकीर्ण- २०२५/प्र.क्र. ९३३ (१)/टीएनटी-१**
**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक: ०२ एप्रिल, २०२६.**

**वाचा :**

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, समक्रमांक, दि. २०.०१.२०२६
२. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. आस्था/प्राथ./१०६/पवित्र-मुशि-प्राधा/२०२६/१७७२४७६, दि. १०.०३.२०२६

**शासन शुध्दीपत्रक :**

संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद १ येथील तक्त्यातील अ.क्र. २ येथे "लागू करावयाची तरतूद" या स्तभांत खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

" उमेदवारांना त्यांच्या अर्हतेनुसार मुलाखतीशिवाय व मुलाखतीसह या निवडीच्या दोन्ही प्रकारांसाठी जाहिरातीतील पात्र असलेले सर्व प्राधान्यक्रम उपलब्ध होतील. तथापि, उमेदवारास त्याच्या सोईनुसार त्यापैकी जास्तीत जास्त एकूण ५० प्राधान्यक्रम लॉक करता येतील. सदर मर्यादा निवडीच्या दोन्ही प्रकारांसाठी स्वतंत्रपणे असेल."

२. उपरोक्त तरतुदीऐवजी खालीलप्रमाणे सुधारित तरतूद वाचण्यात यावी.

" उमेदवारांना त्यांच्या अर्हतेनुसार मुलाखतीशिवाय व मुलाखतीसह या निवडीच्या दोन्ही प्रकारांसाठी जाहिरातीतील पात्र असलेले सर्व प्राधान्यक्रम उपलब्ध होतील. तथापि, मुलाखतीशिवाय या निवडीच्या प्रकारासाठी उमेदवारास त्याच्या सोईनुसार त्यापैकी जास्तीत जास्त एकूण १०० प्राधान्यक्रम लॉक करता येतील. तसेच मुलाखतीसह या निवडीच्या प्रकारासाठी उमेदवारास त्याच्या सोईनुसार त्यापैकी जास्तीत जास्त एकूण ५० प्राधान्यक्रम लॉक करता येतील."

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४०२१३२१३०५५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ABASAHEB ATMARAM KAWALE
Date: 2026.04.02 13:25:27 +05'30'

(आबासाहेब कवळे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

३) मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११) मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व)
१२) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे
१७) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१८) आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद, पुणे
१९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२०) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना)
२१) सर्व गट शिक्षणाधिकारी
२२) राज्यातील सर्व खाजगी अनुदानित/अंशत: अनुदानित/विनाअनुदानित शाळांचे मुख्याध्यापक व संबंधित व्यवस्थापनाचे अध्यक्ष/सचिव.
२३) निवड नस्ती- टीएनटी-१